**कृपया प्रसिध्दीसाठी** **2 ऑक्टोबर 2009**

## ''पायाखालची वाळू सरकल्यामुळे मनसे नेते बरळू लागले आहेत'' - राम नाईक

**मुंबई, शुक्रवार :** मनसेच्या पायाखालची वाळू सरकत असल्याने मनसेचे प्रवक्ते आणि विलेपार्ले विधानसभेचे उमेदवार श्री. शिरीष पारकर बेताल बरळू लागले आहेत. भाजपा नेते "राम नाईक यांना दर तीन महिन्यांनी रक्त बदलावे लागते" हे त्यांचे ताजे वक्तव्य तद्दन खोटारडेपणाचे आहे. त्यामुळे त्याची गंभीर दखल घेऊन श्री. राम नाईक यांनी श्री. पारकर यांच्या विरुध्द आज निवडणूक आयोगाकडे तक्रार केली आहे.

याबाबत अधिक माहिती देताना श्री. राम नाईक म्हणाले,"आयबीएन लोकमत वाहिनीवर ‘आजचा सवाल’ या श्री. निखिल वागळे संचालित कार्यक्रमात गुरुवारी श्री. शिरीष पारकर यांनी माझ्याबद्दल केलेली वक्तव्ये सभ्यता आणि अभिरुची पायदळी तुडवणारी तर होतीच शिवाय निखालस खोटारडीही होती. माझ्या संपूर्ण आयुष्यात रक्त बदलण्याची वेळ माझ्यावर कधीही आली नाही. असे असताना माझ्या प्रकृतीविषयी धादांत खोटे आणि बिनबुडाचे विधान श्री. पारकर यांनी केवळ भाजपा-शिवसेना युतीच्या असूयेपोटीच केले आहे. मला मराठीद्वेष्टा म्हणणा-या मनसेला ‘बॉम्बे - बंबई’चे ‘मुंबई’ केंद्रात माझ्यामुळेच झाले या इतिहासाचे सोयीस्कर विस्मरण झालेले दिसते. माझ्या मराठी प्रेमाला वा राष्ट्रप्रेमाला मनसेच्या प्रमाणपत्राची गरज नाही. माझ्या दोन्ही मुलींचे शिक्षण मातृभाषेतूनच झाले. त्यामुळे ज्यांनी आपल्या मुलांना इंग्रजी माध्यमाच्या शाळेत घातले त्या मनसे नेत्यांनी मराठी प्रेमाचे धडे देऊ नयेत."

श्री. शिरीष पारकर हे विधानसभा निवडणुकीत उमेदवारही आहेत. त्यामुळे त्यांची ही बेताल वक्तव्ये आक्षेपार्ह आणि आचार संहितेचा भंग करणारी असल्याने निवडणूक आयोगाकडेही श्री. नाईक यांनी तक्रार केली आहे. त्याखेरीज या बदनामीकारक वक्तव्याविरुध्द कायदेशीर कारवाई करण्याचा निर्णय श्री. नाईक यांनी घेतला आहे.

**(कार्यालय सचिव)**